# पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाबाबत शाळास्तरावरील समितीच्या सहभाग वाढीसाठी केलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग





**संशोधक**

**डॉ. मंजुषा क्षीरसागर** (प्राचार्य)

व

**डॉ. शिवाजी ठाकूर** (अधिव्याख्याता)

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे



– संशोधन केंद्र –

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

सन –२०२२–२३

# पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाबाबत शाळास्तरावरील समितीच्या सहभाग वाढीसाठी केलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास...

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग


**संशोधक**

**डॉ. मंजुषा क्षीरसागर**

(प्राचार्य)

व

**डॉ. शिवाजी ठाकूर**

(अधिव्याख्याता)

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे

**– संशोधन सहाय्यक –**

सौ. अर्चना नरेंद्र वाडीले

श्रीमती मनिषा शंकर पाटील

श्रीमती चेतना भटू पाटील

श्रीमती वैशाली प्रकाश पाटील

श्रीमती माधवी दिवाण देसले

विषय साधन व्यक्ती

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे



**– संशोधन केंद्र –**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

सन –२०२२–२३

# * अनुक्रमणिका *


| अ.नं. | घटकाचे नांव | पृ.क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले** | **प्रस्तावना** | **५** |
| १-१ | प्रास्ताविक | |
| १-२ | संशोधनाची गरज | |
| १-३ | संशोधनाचे महत्त्व | |
| १-४ | संशोधनाचे समस्या विधान | |
| १-५ | संशोधनाचे उद्दिष्टे | |
| १-६ | संशोधनाची व्याप्ती | |
| १-७ | संशोधनाची मर्यादा | |
| **प्रकरण दुसरे** | **संबंधित साहित्याचा आढावा** | **७** |
| २-१ | प्रास्ताविक | |
| २-२ | संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज | |
| २-३ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० | |
| २-४ | पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शासननिर्णय | |
| २-५ | पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कामकाज करण्यासाठी समिती. | |
| २-६ | निपुण भारत अंतर्गत FLN नुसार शैक्षणिक लक्ष | |
| २-७ | पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षणातील शैक्षणिक साहित्य (PPT) | |
| **प्रकरण तिसरे** | **संशोधन पद्धती** | **९** |
| ३-१ | प्रास्ताविक | |
| ३-२ | संशोधन पद्धती | |
| ३-३ | संशोधन साधने | |
| ३-४ | संशोधनाची तंत्रे | |
| ३-५ | जनसंख्या | |
| ३-६ | नमुना निवड | |
| **प्रकरण चौथे** | **माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** | **११** |
| ४-१ | प्रास्ताविक | |
| ४-२ | माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | |
| **प्रकरण पाचवे** | **संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी** | **१९** |
| ५-१ | प्रास्ताविक | |
| ५-२ | प्रमुख निष्कर्ष | |
| ५-३ | शिफारशी | |
| | संदर्भग्रंथ सूची व परिशिष्टे | |

# प्रकरण १ ले

## प्रस्तावना

**१.१ प्रास्ताविक :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार भविष्यातील सर्व शालेय शिक्षण आणि निरंतर शिक्षणासाठी लिहिता-वाचता येण्याची आणि संख्यावरील मूलभूत गणिती क्रिया प्राप्त होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सुस्पष्ट ध्येयांसह सर्व स्तरावरुन पाऊले उचलणे गरजेचे आहे. जेणेकरुन ही ध्येये अल्पमुदतीत साध्य व्हावेत. यासाठी सर्व केंद्रशासित प्रदेश व राज्यशासन यांनी सन २०२५ पर्यंत साध्य होणारी टप्पानिहाय लक्ष आणि उद्दिष्ट्ये निश्चित करुन सर्व प्राथमिक शाळांमध्ये सार्वत्रिक मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान या क्षमतांच्या प्राप्तीसाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन यांनी दि. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी निपुण भारत अंतर्गत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी आराखडा तयार केला. त्या अनुषंगाने समग्र शिक्षा मध्ये निपुण भारत अंतर्गत वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन २०२६-२७ पर्यंत प्राप्त करण्यासाठी मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांनी दि.२७/०५/२०२२ व दि.२४/१०/२०२३ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा परिषद व महानगरपालिका यांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, पालक व माता-पालक यांचे प्रशिक्षण घेण्याचे आदेशित केले. ज्याप्रमाणे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांची जाणीवजागृती पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाबाबत करायला हवी, तशीच माता-पालकांची ही जाणीव जागृती करणे अपेक्षित आहे. म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने शाळा व्यवस्थापन समिती, पालक व माता-पालक यांचे प्रशिक्षण घेऊन जनजागृती केली आहे.

सदर प्रशिक्षणाचे अनुधावन व जाणीवजागृती परिणाम तपासून पहावे म्हणून या प्रशिक्षणाची संशोधनात्मक मांडणी येथे करत आहोत.

**१.२ संशोधनाची गरज :-**

प्रशिक्षणाद्वारे जाणीव जागृतीची गरज यात पायाभूत साक्षरतेचे घटक व प्रारंभिक गणितीय घटकांचा समावेश आहे.

| **पायाभूत साक्षरतेचे घटक** | **प्रारंभिक गणिताचे दृष्टिकोन (घटक)** |
|---|---|
| १. मौखिक भाषा विकास | १. संख्यापूर्व तयारी |
| २. उच्चार शास्त्राची जाणीव | २. संख्या व संख्यावरील क्रिया |
| ३. सांकेतिक भाषा/लिपी समजून | ३. गणना करणे |
| ४. शब्द संग्रह | ४. आकार व अवकाश याबाबत समजून घेणे. |
| ५. वाचन व अभ्यासक्रम आकलन | ५. नमुना/संरचना |
| ६. वाचनातील ओघवतेपणा | |
| ७. लेखन | |
| ८. आकलन | |
| ९. वाचन संस्कृती/वाचनाकडे कल | |

१. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व मातापालकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरतेचे घटक व प्रारंभिक गणिताचे घटक माहिती आहेत का?

२. प्रत्येक मुलाला पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त व्हावी यासाठी समिती सदस्य यांचे प्रशिक्षण घेता येईल काय?

३. व्यवस्थापन समिती सदस्य यांचेकडून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्तीसाठी काही उपक्रम करता येतील का?

४. प्रत्येक वर्गात इयत्ता १ ली ते ३ रीचे वर्गशिक्षक यासंबंधी उपक्रम राबवित आहेत किंवा नाही हे तपासणे?

५. विद्यार्थ्यांची चाचणी व परीक्षेच्या माध्यमातून पायाभूत संपादणूक पातळी तपासून भाषिक व गणितीय कौशल्य वाढीसाठी प्रयत्न करण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे.

**१.३ संशोधनाचे महत्त्व :-**

१. विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व माता-पालकांच्या मदतीने मुलभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या क्षमता प्राप्तीसाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

२. प्रशिक्षणाच्या माध्यमातून शाळा व्यवस्थापन समिती सदस्य पालक व मातापालकांना विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्तीसाठी व वाढीसाठी काही उपक्रम राबवण्यास मदत होईल.

३. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्तीसाठी इ.१ली ते ३ रीच्या वर्गशिक्षकांना विविध उपक्रम राबविणे संदर्भात योग्य दिशा मिळेल.

४. कोविड काळात मुलांचे जे शैक्षणिक नुकसान झालेले आहे ते भरुन काढण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

**१.४ संशोधनाचे समस्या विधान :-**

धुळे जिल्ह्यातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक माता-पालक यांच्या सहभागाने पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियामानाची अंमलबजावणी होण्यासाठी घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाद्वारे झालेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास.

**१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी जाणीव जागृती प्रशिक्षणातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, माता-पालकांच्या उपस्थिती बाबतची सद्यस्थिती जाणणे.

२) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाबाबत शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता-पालक यांनी दिलेल्या अभिप्रायांचे विश्लेषण करणे.

३) शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालक यांच्यात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी जाणीव जागृती निर्माण करणे.

**१.६ संशोधनाची व्याप्ती :-**

१) प्रस्तुत संशोधनात धुळे जिल्ह्यातील धुळे, शिंदखेडा, शिरपूर, साक्री व मनपा यांचा समावेश आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालकांपुरते व्याप्त आहे.

३) प्रस्तुत संशोधनामध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालकांनी दिलेल्या अभिप्रायांचा समावेश केलेला आहे.

४) सदर संशोधनात जाणीव जागृती प्रशिक्षणातील केवळ अडीच तास दिलेल्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या माहितीचा समावेश आहे.

**संशोधनाची मर्यादा :-**

१) प्रस्तुत संशोधन धुळे जिल्ह्यातील चार तालुके धुळे शिरपूर, शिंदखेडा, साक्री व मनपा पुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालकांपुरतेचच मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या जाणीव जागृती प्रशिक्षणातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालकांनी दिलेल्या अभिप्रायापुरतेच मर्यादित आहे.

# प्रकरण २ रे

## संबंधित साहित्याचा आढावा

**२.१ प्रास्ताविक :-**

प्रस्तुत संशोधनासाठी सारांश पुस्तिका, NEP-2020 पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षणास उपस्थित शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान संबंधित सर्व शासन निर्णय व माहिती देवून त्याबाबत आढावा घेण्यात आला आहे.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांची जाणीवजागृती करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत २ जुलै २०२२ रोजी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

**२.२ संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज :-**

संशोधनाशी निगडीत साहित्य वाचल्यामुळे आराखडा,पद्धती, तंत्रे, साधन, अहवाल यासाठी मदत झाली.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० :-**

१) २१ व्या शतकातील पहिले धोरण आहे.

२) सन २०२६-२७ पर्यंत इयत्ता ३ री पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या क्षमता प्राप्त करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे ध्येय आहे.

३) ध्येय साध्य होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालकांची मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी जाणीव जागृती होणे गरजेचे आहे.

४) २०२३ पर्यंत सर्वांसाठी समावेशक व समन्यायी गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि निरंतर शिक्षणाच्या संधींना चालना देणे हे या धोरणाने अपेक्षिले आहे.

**पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) शासन निर्णय :-**

१) प्रस्तुत संशोधनासाठी निपूण भारत अंतर्गत मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी याबाबतचा २१ ऑक्टो.२०२१ च्या शासननिर्णयाचा अभ्यास करण्यात आला आहे.

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक स्तरावर इयत्ता ३ री पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्तीला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

३) मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान बाबतची जाणीव जागृती सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालकांमध्ये करणे गरजेचे आहे. जेणेकरून शाळे व्यतिरिक्त माता-पालक विद्यार्थ्यांची तयारी घरी करुन घेवू शकतील.

४) कोविड-१९ च्या कालावधीत मुलांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी विविध कौशल्ये प्राप्तीला प्राधान्य.

**पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शासन निर्णयानुसार कामकाज करण्यासाठी खालील समित्या स्थापन केलेल्या आहेत.**

१) राज्यस्तरीय सुकाणू समिती

२) जिल्हास्तरीय सुकाणू समिती

३) राज्यस्तरीय प्रक़ल्प संनियंत्रण कक्ष (pmu)

४) जिल्हास्तरीय प्रकल्य सनियंत्रण कक्ष (pmu)

**निपुण भारत :-**

निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान नुसार राज्यातील ३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ पर्यंत खालील मुद्यांवर शैक्षणिक लक्ष निर्धारित केले आहे.

१) भाषा साक्षरता

२) संख्या साक्षरता

३) आनंददायी व्यक्तिमत्वाची जोपासना

४) समावेशित शिक्षण

**पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षणात वापरण्यात आलेले शैक्षणिक साहित्य** (PPT)

१) सदर प्रशिक्षण झाल्यानंतर जिल्हास्तरावर भेट देणाऱ्या अधिकारी/कर्मचारी/ मुख्याध्यापक यांचा प्रशिक्षणाबद्दल अभिप्राय link द्वारा घेण्यात आला.

२) जिल्हास्तरावरुन पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाबाबत PPT देण्यात आल्या.

वरील संदर्भिय साहित्याचा उपयोग संशोधनात पुढील संकल्पना विकसित करण्यासाठी झालेला आहे.

१) संशोधन साधन साहित्याच्या निर्मितीसाठी.

२) संशोधनाची विश्लेषणात्मक मांडणी करण्यासाठी.

३) संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी मांडण्यासाठी

यावरुन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांची जाणीव जागृती करुन विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानातील अपेक्षित लक्ष प्राप्तीसाठी प्रस्तुत संशोधनाची मदत होईल.

---

# प्रकरण ३ रे

## संशोधन पद्धती

**३.१ प्रास्ताविक :-**

प्रस्तुत संशोधन कोणत्या पद्धतीने केले, माहिती संकलनासाठी कोण-कोणत्या पद्धती व साधने वापरली, नमुना निवड कशी केली, तक्ते कशा प्रकारे तयार केले तसेच संख्याशास्त्र कोणते वापरले याबद्दल सकारण व सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

**३.२ संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धती वापरली आहे.

**३.३ संशोधनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनात अभिप्रायात्मक प्रश्नावली या साधनाचा उपयोग केलेला आहे.

**३.४ संसोधनाची तंत्रे :-**

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाचे दस्तऐवज याद्वारे संकलित झालेल्या आधार सामग्रीवरुन अर्थनिर्वचन करण्यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय प्रणालीचा वापर करण्यात आला. याआधारे अर्थनिर्वचन मांडण्यात आले.

**३.५ जनसंख्या व नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधनात निवड केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, माता पालक, मुख्याध्यापक, शिक्षक व इतर (शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ, अंगणवाडी कर्मचारी, मदतनीस) ही संशोधनाची जनसंख्या आहे.

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | शाळा संख्या | मुख्या-ध्यापक | शिक्षक | SMC सदस्य संख्या | पालक | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | २२४ | २२४ | २२४ | ३३६० | ५६०० | १७९२ | ११२०० |
| २ | | शिंदखेडा | १६८ | १६८ | १६८ | २५२० | ४२०० | १३४४ | ८४०० |
| ३ | | शिरपूर | २६८ | २६८ | २६८ | ४०२० | ६७०० | २१४४ | १३४०० |
| ४ | | साक्री | ४४५ | ४४५ | ४४५ | ६६७५ | १११२५ | ३५६० | १८६९० |
| ५ | | मनपा | ०२१ | ०२१ | ०२१ | ३१५ | ५२५ | १६८ | १०५० |
| | | **एकूण** | ११२६ | ११२६ | ११२६ | १६८९० | २८१५० | ९००८ | ५२७४० |

**३.६ नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी सहेतुक नमुना निवड केलेली आहे.

**अ. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांचे एक दिवसीय प्रशिक्षण उपस्थिती तक्ता**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | शाळा संख्या | मुख्या-ध्यापक | शिक्षक | SMC सदस्य संख्या | पालक | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | २२४ | २२४ | २२४ | २७०८ | ३२१९ | १५०५ | ७४३२ |
| २ | | शिंदखेडा | १६८ | १६८ | १६८ | १०८३ | ३१५७ | ५९७ | ४८३७ |
| ३ | | शिरपूर | २६८ | २६८ | २६८ | २३२४ | ४६९७ | १२८२ | ८३०३ |
| ४ | | साक्री | ४४५ | ४४५ | ४४५ | २५६१ | ३८२८ | १६४३ | ८०३२ |
| ५ | | मनपा | ०२१ | ०२१ | ०२१ | २१९ | ४२७ | १३५ | ७८१ |
| | | **एकूण** | **११२६** | **११२६** | **११२६** | **८८९५** | **१५३२८** | **५१६२** | **२९३८५** |

**ब. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या विषयीचे मातापालक यांचे एक दिवसीय प्रशिक्षण उपस्थिती तक्ता**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थींचे नावे | धुळे | शिंदखेडा | शिरपूर | साक्री | धुळे मनपा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी/बालवाटीका माता उपस्थिती | ६०९ | ३०२ | ४६१ | ९०९ | १६ | २२९७ |
| २ | इ.१ ली माता-पालक उपस्थिती | १७६४ | ९३७ | ११८१ | २३१७ | २२ | ६२२१ |
| ३ | इ.२ री माता-पालक उपस्थिती | १७७३ | ९५७ | ११८७ | २२५३ | २३ | ६१९३ |
| ४ | इ.३ री माता-पालक उपस्थिती | १७२९ | ९३३ | १११३ | २१२९ | २३ | ५९२७ |
| ५ | इ.४ थी माता-पालक उपस्थिती | १५९१ | ९२६ | १०५५ | १९३९ | २८ | ५५३९ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी/मदतनीस उपस्थिती | ३३३ | १८८ | २५४ | ७२९ | ०८ | १५१२ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | ७६५ | ३७१ | ४८३ | १०९० | १७ | २७२६ |
| | **एकूण** | **८५६४** | **४६१४** | **५७३४** | **११३६६** | **१३७** | **३०४१५** |

## प्रकरण ४ थे

### माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

**४.१ प्रास्ताविक :-**

धुळे जिल्ह्यातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालक यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची जाणीव जागृती होण्यासाठी प्रशिक्षण घेण्यात आले. सदर लघुसंशोधनासाठी वापरलेल्या प्रशिक्षण, दस्तऐवज, अभिप्राय प्रश्नावली यासारख्या साधनांद्वारे माहिती संकलित करण्यात आली संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केलेले आहे.

**४.१ अ :-** पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयीचे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक यांचे एकदिवसीय प्रशिक्षण उपस्थितीची टक्केवारी निर्देशित तक्ता.

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | शाळा संख्या | शा.व्य.स.सदस्य व पालक एकूण उपस्थिती | प्रशिक्षणात शा.व्य.स. सदस्य व पालक उपस्थिती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | २२४ | ११२०० | ७४३२ | ६६.३६ |
| २ | | शिंदखेडा | १६८ | ८४०० | ४८३७ | ५७.५८ |
| ३ | | शिरपूर | २६८ | १३४०० | ८३०३ | ६१.७६ |
| ४ | | साक्री | ४४५ | १८६९० | ८०३२ | ४२.९७ |
| ५ | | मनपा | ०२१ | १०५० | ७८१ | ६८.३८ |
| | | **एकूण** | **११२६** | **५२७४०** | **२९३८५** | **५५.७१%** |

**४.१ अ :- विश्लेषण**

१) वरील कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, धुळे जिल्ह्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांचे प्रशिक्षणात १००% उपस्थिती अपेक्षित असतांना धुळे तालुक्यात केवळ ६६.३६% शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

२) वरील कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, शिंदखेडा तालुक्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांचे प्रशिक्षणात १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ ५७.५८% शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

३) वरील कोष्टकावरून असे निदर्शनास येते की शिरपूर तालुक्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांचे प्रशिक्षणात १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ ६१.७६% शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते

४) वरील कोष्टकानुसार असे निदर्शनास येते की साक्री तालुक्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांचे प्रशिक्षण १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ ४२.९७% शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

५) वरील कोष्टकानुसार असे निदर्शनास येते की, महानगरपालिका क्षेत्रात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांची १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ ६८.३८% शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

**४.१.अ- अर्थनिर्वचन**

**१) धुळे**

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, धुळे तालुक्यात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक याची उपस्थिती खूपच कमी दिसून येते.

**२) शिंदखेडा** :

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, धुळे तालुक्यापेक्षा शिंदखेडा तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांची उपस्थिती कमी दिसून येते.

**३) शिरपूर**

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, धुळे आणि शिंदखेडा या तालुक्यांच्या तुलनेने शिरपूर तालुक्याची शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि पालक यांची उपस्थिती ६२% म्हणजेच कमी दिसते.

४) धुळे जिल्ह्यातील ३ तालुक्यांच्या तुलनेत साक्री हा तालुका क्षेत्रफळ व शाळा संख्येच्या बाबतीत मोठा असून देखील उपस्थिती असमाधानकारक आहे.

५) धुळे जिल्ह्यात महानगपालिका क्षेत्रात शाळा संख्या कमी असून तुलनेने १००% उपस्थिती असू शकते, अशी परिस्थिती असतांना देखील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांची उपस्थिती समाधानकारक दिसून येत नाही. वरील सर्व माहितीच्या आधारे असे लक्षात येते की, धुळे जिल्ह्यातील सर्व तालुके व महानगरपालिका क्षेत्रात शाळा व समिती सदस्य व पालक यांची प्रशिक्षणाला १००% उपस्थिती दिसून आली नाही.

**४.२-ब-**

**पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयाचे मातापालक यांचे एक दिवसीय प्रशिक्षण उपस्थितीची टक्केवारी निर्देशित तक्ता-**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण माता-पालक उपस्थिती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | ८५६४ | २८.१६ |
| २ | | शिंदखेडा | ४६१४ | ०.४५ |
| ३ | | शिरपूर | ५७३४ | १५.१७ |
| ४ | | साक्री | ११३६६ | १८.८५ |
| ५ | | मनपा | १३७ | ३७.३६ |
| | | **एकूण** | **३०४१५** | |

१) वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, धुळे जिल्ह्यातील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात धुळे तालुक्यात माता-पालकाची १००% उपस्थिती अपेक्षित असताना केवळ २८.१६% उपस्थिती दिसून येते.

२) वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, शिंदखेडा तालुक्यात माता-पालक यांची १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ ०.४५% माता-पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

३) वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, शिरपूर तालुक्यात माता-पालक यांची १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ १५.१७% माता-पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

४) वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असे निदर्शनास येते की, साक्री तालुक्यात माता-पालक यांची १००% उपस्थिती अपेक्षित असतांना केवळ १८.८५% माता-पालक यांनी प्रशिक्षण घेतल्याचे दिसून येते.

५) वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे लक्षात येते की, महानगरपालिका क्षेत्रात माता-पालकांची उपस्थिती ३७.३६% इतकी आहे.

**४.१.ब माता-पालक यांचे एक दिवसीय प्रशिक्षण उपस्थितीचे अर्थनिर्वचन :-**

१. वरील विश्लेषणावरून असे लक्षात येते की, व्यवस्थापन समितीत महिला पालकांना ७५% प्रतिनिधीत्व दिलेले आहे. तरी देखील धुळे तालुक्यातील प्रशिक्षणात माता-पालकांची उपस्थिती २८% म्हणजेच पूर्णत: असमाधानकारक दिसून येते.

२. वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते की, शिंदखेडा तालुक्यात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयीच्या प्रशिक्षणात माता-पालकांची उपस्थिती अजिबात नाही.

३. वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते की, धुळे तालुक्याच्या तुलनेने शिरपुर तालुक्यात प्रशिक्षणास माता-पालक यांची उपस्थिती अत्यल्प दिसून आली.

४. वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, साक्री तालुक्यात माता-पालक प्रशिक्षणास माता-पालकांची उपस्थिती कमी दिसून येते.

५. वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की महानगरपालिका क्षेत्रात प्रशिक्षणास माता-पालकांची उपस्थिती असमाधानकारक दिसते.

वरील सर्व माहितीच्या आधारे असे समजते की, धुळे जिल्ह्यातील चारही तालुके व मनपा क्षेत्रात शाळा व्यवस्थापन समितीत माता-पालकांचा ७५% समावेश असून देखील उपस्थितीचे प्रमाण चिंताजनक तसेच असमाधानकारक दिसते. म्हणूनच या मातापालकांचे आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयी प्रबोधन होणे गरजेचे आहे.

**४.२ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मातापालकांचे एक दिवसीय प्रशिक्षणाचे इयत्तानिहाय मातापालक उपस्थिती दर्शविणारा तक्ता.**

**प्रास्ताविक :**

धुळे जिल्ह्यात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी मातापालकांची जाणीव जागृती होण्यासाठी अंगणवाडी, माता इ.१ली, २री, ३री व ४ थी चे मातापालक व अंगणवाडीताई, सेविका यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षणात धुळे, शिंदखेडा, शिरपूर, साक्री व मनपा क्षेत्रातील मातापालकांची उपस्थिती व टक्केवारी पुढीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

**४.२ तक्ता क्र.१-पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाची इयत्तानिहाय मातापालक उपस्थिती-धुळे तालुका**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी | एकूण उपस्थित संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी माता | ६०९ | ७.११ |
| २ | इ.१ लीच्या मातापालक | १७६४ | २०.६० |
| ३ | इ.२ रीच्या मातापालक | १७७३ | २०.७० |
| ४ | इ.३ रीच्या मातापालक | १७२९ | २०.१९ |
| ५ | इ.४ थीच्या मातापालक | १५९१ | १८.५८ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी | ३३३ | ३.८९ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | ७६५ | ८.९२ |
| | **एकूण** | **८५६४** | |

**विश्लेषण :** वरील कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान माता-पालक प्रशिक्षणात इ. २ रीच्या विद्यार्थ्यांच्या मातापालकांची उपस्थिती सर्वाधिक म्हणजेच २०.७०% इतकी दिसून आली. तर अंगणवाडी ताई व सेविका यांची उपस्थिती सर्वात कमी म्हणजेच ३.८९% इतकी दिसून येते.

**४.२ तक्ता क्र.२ - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाची इयत्तानिहाय माता-पालक उपस्थिती-शिंदखेडा तालुका**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी | एकूण उपस्थित संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी माता उपस्थिती | ३०२ | ६.५४ |
| २ | इ.१ लीच्या मातापालक उपस्थिती | ९३७ | २०.३० |
| ३ | इ.२ रीच्या मातापालक उपस्थिती | ९५७ | २०.७४ |
| ४ | इ.३ रीच्या मातापालक उपस्थिती | ९३३ | २०.२२ |
| ५ | इ.४ थीच्या मातापालक उपस्थिती | ९२८ | २०.०६ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी उपस्थिती | १८८ | ४.०७ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | ३७१ | ८.०४ |
| | **एकूण** | **४६१४** | |

**विश्लेषण :** वरील कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) प्रशिक्षणात शिंदखेडा तालुक्यातून इ. २रीच्या विद्यार्थ्यांच्या माता-पालकांची उपस्थिती २०.७४% तर अंगणवाडी कर्मचारी यांची उपस्थिती ४.०७ इतकी आढळून आली.

**४.२ तक्ता क्र.३ - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाची इयत्तानिहाय माता-पालक उपस्थिती-साक्री तालुका**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी | एकूण उपस्थित संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी माता उपस्थिती | ९०९ | ७.९९ |
| २ | इ.१ लीच्या मातापालकांची उपस्थिती | २३१७ | २०.३८ |
| ३ | इ.२ रीच्या मातापालकांची उपस्थिती | २२५३ | १९.८२ |
| ४ | इ.३ रीच्या मातापालकांची उपस्थिती | २१२९ | १८.७३ |
| ५ | इ.४ थीच्या मातापालकांची उपस्थिती | १९३९ | १७.०५ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी उपस्थिती | ७२९ | ६.४१ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | १०९० | ९.५९ |
| | **एकूण** | **११३६६** | |

**विश्लेषण :** वरील कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की, साकी तालुक्यातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान माता-पालक प्रशिक्षणात इ.१लीच्या विद्यार्थ्यांच्या माता-पालकांची उपस्थिती सर्वाधिक म्हणजेच २०.८८% तर अंगणवाडी कर्मचारी यांची उपस्थिती सर्वात कमी म्हणजेच ६.४१ इतकी दिसून येते.

**४.२ तक्ता क्र.४ - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाची इयत्तानिहाय माता-पालक उपस्थिती-शिरपूर तालुका -**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी | एकूण उपस्थित संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी माता उपस्थिती | ४६१ | ८.०४ |
| २ | इ.१ लीच्या मातापालकांची उपस्थिती | ११८१ | २०.६० |
| ३ | इ.२ रीच्या मातापालकांची उपस्थिती | ११८७ | २०.७० |
| ४ | इ.३ रीच्या मातापालकांची उपस्थिती | १११३ | १९.४१ |
| ५ | इ.४ थीच्या मातापालकांची उपस्थिती | १०५५ | १०.६१ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी उपस्थिती | २५४ | ४.४२ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | ४८३ | ८.४२ |
| | **एकूण** | **५७३४** | |

**विश्लेषण :** वरील कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) प्रशिक्षणात शिरपूर तालुक्यातून इ.२ रीच्या विद्यार्थ्यांच्या माता-पालकांची उपस्थिती सर्वाधिक म्हणजेच २०.७०% तर अंगणवाडी कर्मचारींची उपस्थिती ४.४२% म्हणजेच सर्वात कमी दिसून येते.

**४.२ तक्ता क्र.५ - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणाची इयत्तानिहाय माता-पालक उपस्थिती - मनपा धुळे तालुका -**

| अ. क्र. | प्रशिक्षणार्थी | एकूण उपस्थित संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी माता उपस्थिती | १६ | ११.६७ |
| २ | इ.१ लीच्या मातापालकांची उपस्थिती | २२ | १६.०५ |
| ३ | इ.२ रीच्या मातापालकांची उपस्थिती | २३ | १६.७८ |
| ४ | इ.३ रीच्या मातापालकांची उपस्थिती | २३ | १६.७८ |
| ५ | इ.४ थीच्या मातापालकांची उपस्थिती | २८ | २०.४३ |
| ६ | अंगणवाडी कर्मचारी उपस्थिती | ०८ | ५.८३ |
| ७ | शिक्षक उपस्थिती | १७ | १२.४० |
| | **एकूण** | **१३७** | |

**विश्लेषण :** वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे दिसते की, धुळे महानगरपालिका प्रशासन विभागातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मातापालक प्रशिक्षणात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांच्या माता-पालकांची उपस्थिती सर्वात जास्त २०.४३% तर अंगणवाडी कर्मचारी यांची उपस्थिती सर्वात कमी म्हणजेच ५.८३% इतकी दिसून येते.

### ४.३ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयीच्या प्रशिक्षणाचे अर्थनिर्वचन-

तक्ता क्र. I,II,III,IV,V इयत्तानिहाय मातापालक उपस्थितीचे अर्थनिर्वचन

वरील माहितीच्या आधारे असे निदर्शनास येते की, धुळे जिल्ह्यातील चारही तालुके व मनपा क्षेत्रात घेण्यात आलेल्या प्रशिक्षणात मातापालक व अंगणवाडीताई यांची उपस्थिती नगण्य असल्याचे दिसून आले.

विद्यार्थी गुणवत्ता वाढविणेसाठी मातापालकांचे व अंगणवाडीताई, अंगणवाडीसेविका यांचे उद्‌बोधन करणे आवश्यक आहे.परिणामी जनजागृतीद्वारे प्रस्तुत शालेय गुणवत्तेत प्रस्तुत घटकांचा सहभाग कमी राहील.

### ४.३.१ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत घेण्यात आलेल्या शाळा-व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांच्या प्रशिक्षणात शंकानिरासनाबाबत विचारलेले निवडक प्रश्न

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मुलांची आनंदी व्यक्तीमत्त्वाची जोपासना होणेसाठी कोणते उपक्रम शाळेत राबवतील ? | खेळ, योगासने, गाणी गोष्टी, भूमिकाभिनय, चित्रकला स्पर्धाचे आयोजन ही आनंदी व्यक्तिमत्वाची जोपासना होणेसाठी असे उपक्रम शाळेत राबवावे. | ४६% |
| २. | पायाभूत साक्षरता म्हणजे काय? | प्रारंभिक भाषा विकास होणेसाठी मातृभाषेत मौखिक भाषाज्ञान समजपूर्वक ऐकणे व त्याचे आकलन होणे. मुद्रणशास्त्र व उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी साध्या संख्यात्मक व कल्पनांचा वापर करण्याची क्षमता, संख्यापूर्व व संख्या कल्पनेचा विकास, तुलना करण्याचे ज्ञान व कौशल्ये क्रमशः मांडणी करणे. | ३९% |
| ३. | संख्याज्ञान म्हणजे काय? | संख्यांची ओळख मोजणे/गणन संख्यांवरील क्रिया (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार) यास संख्याज्ञान म्हणतात. | ३८% |
| ४. | समावेशित शिक्षणात कोणत्या प्रकाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. | समावेशित शिक्षणात दिव्यांगाचे २१ प्रकार आहेत. उदा. अस्थिरोग मतिमंद, मुकबधिर, दृष्टीदोष कर्णबधिर इ. | ३०% |
| ५. | शिक्षक कौशल्ये प्राप्तीसाठी कोणत्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करतात. | भाषिक कौशल्य विकासासाठी अक्षर,शब्द, वाक्य कार्ड, चित्रकार्ड गणितीय कौशल्यासाठी अंककार्ड, बेरीज, वजाबाकी पाटी इ. | ४२% |

**४.३.२ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या अंमलबजावणीसाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांनी प्रशिक्षणाचे अभिप्राय गुगललिंकद्वारे दिले.**

A) **शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांचे अभिप्रायाचे विश्लेषण**

| प्रश्न क्र. | विधाने | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांना प्रशिक्षणाचे महत्व कळाले | १२९२६ | ५३.३५% |
| २. | पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालकांस आपले कर्तव्य व भूमिका समजल्या | १४२२३ | ५८.७०% |
| ३. | इतर १) प्रशिक्षण वेळ २) विद्यार्थी गुणवत्ता | १६२३७ | ६७.०१% |

B) **मातापालक यांच्या प्रशिक्षणात शंकानिरासन विचारलेले निवडक प्रश्न**

| | | | |
|---|---|---|---|
| **ब.** | १.मातापालकांना प्रशिक्षणाचे महत्व कळाले | १३३८७ | ५१.१४% |
| | २.पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयी मातांना आपले कर्तव्य व भूमिका समजल्या | १३६५६ | ६२.१६% |
| | ३. इतर | १५६३२ | ५९.७२% |

**४.३.२ शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व मातापालक यांचे अभिप्रायांनी दिलेल्या अभिप्रायांबद्दल माहितीचे विश्लेषण :-**

१) वरील कोष्टकांवरुन असे लक्षात येते की,

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात मातापालकांच्या (५१%) तुलनेत शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक (५३%) यांना प्रशिक्षणाचे महत्व अधिक कळाले.

२) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात मातापालकांच्या (५२%) तुलनेत शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक (५९%) यांना आपले कर्तव्य व भूमिका अधिक चांगल्या प्रकारे समजल्या.

३) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात शाळाव्यवस्थापन समिती सदस्य व पालक (६७%) यांच्या तुलनेत माता-पालक (६०%) इतर अभिप्राय नगण्य आहेत.

**४.३.३. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व माता पालकांच्या अभिप्रायाचे अर्थनिर्वचन :-**

वरील माहितीच्या विश्लेषणावरुन असे निदर्शनास येते की पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्रशिक्षणात शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, मातापालक व अंगणवाडीताई यांनी नोंदविलेल्या अभिप्रायांची टक्केवारी समाधानकारक नाही. म्हणून धुळे जिल्हयातील शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, माता पालक, अंगणवाडीताई या व्यतिरिक्त जे सदस्य नाही. त्यांची पाल्ये शाळेत शिकत आहेत. अशाही पालकांना विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता व सर्वांगीण विकासाबाबत अवगत होणेसाठी त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची आनंदी व्यक्तीमत्वाची जोपासना व गुणवत्तेबाबत जाणीव जागृती होणेसाठी सदर प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

# प्रकरण ५ वे

## संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

### ५.१ प्रस्तावना -

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सारांश, निष्कर्ष शिफारशी यांचा समावेश करण्यात आला आहे.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबत गुणवत्ता प्राप्तीसाठी शिखर संस्था म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे यांचेकडे निष्कर्ष व शिफारशी देण्यात आलेल्या आहे.

### ५.२ संशोधनाचा निष्कर्ष

१. पायाभूत साक्षरतेविषयी जाणीवजागृती होण्यासाठी सदर प्रशिक्षण शाळा व्यवस्थापन समिती सदस्य पालक व मातापालक अंगणवाडीताई सेविका यांना देण्यात आले होते. परंतु या प्रशिक्षणास १००% उपस्थिती दिसून आली नाही. परिणामी जाणीवजागृतीद्वारे शालेय गुणवत्तेच्या बाबतीत प्रस्तुत घटकांचा सहभाग कमी राहील.

२. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक मातापालक, अंगणवाडीताई सेविका याव्यतिरिक्त ते सदस्य नाहीत त्याची पाल्ये शाळेत शिकत आहेत अशाही पालकांना विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता व सर्वांगीण विकासाबाबत अवगत होणेसाठी त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या आनंदी व्यक्तीमत्वाची जोपासना व गुणवत्तेबाबत जाणीव जागृती होणे गरजेचे आहे.

३. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मधील भाषिक व गणितीय कौशल्यात नेमक्या कोणत्या कृती शाळेत करुन घ्यायच्या आहेत ते शालेय स्तरावरील विविध समिती सदस्यांना समजले.

४. सन २०२६-२७ पर्यंत प्रत्येक मुलाला लिहिता-वाचता येईल याबाबत पालक शाळाव्यवस्थापन समिती सदस्य, मातापालक यांच्या लक्षात आले.

### ५.३ शिफारशी -

१. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याविषयी वेळोवेळी जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण, उपक्रम व इतर कार्यक्रम महिना, तीन किंवा सहा महिन्यातून एकदा घ्यावेत.

२. शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावर व गटशिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरावर पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याविषयी वेळोवेळी पर्यवेक्षिय यंत्रणेचा आढावा घेवून करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करावे.

३.शिक्षणविस्तार अधिकारी यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याविषयी बीटमधील सर्व मुलांना भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्तीसाठी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक यांना लक्ष ठरवून सर्वांना क्षमता प्राप्त होतील.यासाठी उपाययोजना कराव्यात.

४. केंद्रप्रमुख यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याविषयी जनजागृती करुन देऊन शाळास्तरावर, गावस्तरावर प्रत्येक मुलाला पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त व्हावे यासाठी कृती कार्यक्रमाचे आयोजन करावे.

५. जिल्हास्तरावर होणाऱ्या शिक्षण परिषदातून शिक्षकांमध्ये केंद्रात वारंवार चर्चा घडून आणल्या पाहिजे.

**संदर्भग्रंथ साहित्य सूची -**


१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मानव संसाधन विकास मंत्रालय (शिक्षण मंत्रालय) भारत सरकार

२) मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान-शासन निर्णय-२७ ऑक्टोबर २०२१ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन

३) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानबाबत सर्व परिपत्रके व माहिती स्पष्ट करणाऱ्या Power Point Presentation (PPT) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

४) निवड श्रेणी प्रशिक्षण (अध्यापक विद्यालयस्तर) शाळा व्यवस्थापन समितीबाबत भूमिका आणि जबाबदाऱ्या

५) शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रशिक्षण हस्तपुस्तिका RTE -२००९
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन-मंत्रालय, मुंबई

६) जिल्हास्तरीय लघुसंशोधन -जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना.

# जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धुळे

